## MAHARASHTRA ACT No. XXX OF 1982.

THE MAHARASHTRA VACANT LANDS (FURTHER INTERIM PROTECTION TO OCCUPIERS FROM EVICTION AND RECOVERY OF ARREARS OF RENT) (SECOND EXTENSION OF DURATION) ACT, 1982.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ११ ऑक्टोबर १९८२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन.चौधरी,
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXX OF 1982.

AN ACT TO EXTEND THE DURATION OF THE MAHARASHTRA VACANT LANDS (FURTHER INTERIM PROTECTION TO OCUPIERS FROM EVICTION AND RECOVERY OF ARREARS OF RENT) ACT, 1980.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात**, दिनांक १४ ऑक्टोबर १९८२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

**महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) अधिनियम, १९८० याची मुदत वाढविण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९८० चा महा. १६. १९८२ चा महा. अध्या. १४.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) अधिनियम, १९८० याची मुदत, यात यापुढे दिलेल्या कारणांकरिता, वाढविण्यासाठी, राज्यपाल यांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक ठरते अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल यांची खात्री झाली होती; व म्हणून त्यांनी महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) (मुदत दुसऱ्यांदा वाढविणे) अध्यादेश, १९८२ हा, ३१ ऑगस्ट १९८२ रोजी प्रख्यापित केला ;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेहतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाडयाची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) (मुदत दुसऱ्यांदा वाढवणे) अधिनियम, १९८२ असे म्हणता येईल.

(२) तो ३१ ऑगस्ट १९८२ रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम १६ याच्या कलम १ ची सुधारणा. २. महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाडयाची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) अधिनियम, १९८० (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १, पोट-कलम (३) मधील "३० सप्टेंबर १९८२" या मजकुराऐवजी "३१ मार्च १९८३" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९८० चा महा. १६.

सन १९८२ चा महाराष्ट्र अध्यादेश १४ याचे निरसन व व्यावृत्ती. ३. (१) महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाडयाची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) (मुदत दुसऱ्यांदा वाढवणे) अध्यादेश, १९८२ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८२ चा महा. अध्या. १४.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाद्वारे केलेली यथास्थिती गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई